UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९२ • मार्च २०२४ • पुरवणी विशेषांक ५४




प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

पुरवणी अंक ५४ – मार्च – २०२४ (त्रैमासिक)

● शके १९४५ ● वर्ष : ९१ ● पुरवणीअंक : ५४

संपादक मंडळ

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

● डॉ.दीपक भारती ● डॉ.शिवाजी पाते ● डॉ.राम सोलंकर ● प्राचार्य डॉ.शिवदास शिरसाठ

❊ प्रकाशक ❊

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
ई-मेल : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

कार्यालयीन वेळ
सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

अंक मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-; सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळवणी : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

ISSN No 2394-5990

१९ भारतातील दारिद्र्याचा ( गरिबीचा ) चिकित्सक अभ्यास
- १) डॉ.बी. एच. दामजी; २) एस. बी. भोसले, सोलापूर ---------------------- ९४

२० भारतातील दारिद्र्य व परिणाम - डॉ. वाय. बी. चव्हाण, अंबाजोगाई, जि. बीड --------- १०२

२१ भारतातील दारिद्र्य : एक अवलोकन - डॉ. आत्माराम मुळीक, कराड -------------- १०५

२२ भारतातील दारिद्र्य समस्येचा अभ्यास - डॉ.जयश्री तळेकर, छत्रपती संभाजीनगर. --------- १०९

२३ भारतातील दारिद्र्याची कारणे आणि उपाय - डॉ. कागदे बी. बी., अंबाजोगाई. --------- ११३

२४ भारतातील दारिद्र्यगणना : बहुआयामी दारिद्र्य-निर्देशांक एक अभ्यास
- उदयराज चव्हाण, नांदेड ------------------------------------------ ११७

२५ भारतातील दारिद्र्य : स्वरूप, कारणे आणि उपाय - डॉ.चंद्रशेखर देशमुख, उदगीर, जि.लातूर, - १२१

२६ 'चारखणी'तील दारिद्र्याचे स्वरूप - प्राचार्य डॉ.शिवदास शिरसाठ, अंबाजोगाई. --------- १२५

२७ भारतातील बहुआयामी दारिद्र्य - डॉ.डी. के. ढास, नेकनूर, ता. जि. बीड ------------ १३१

२८ भारतातील दारिद्र्य : स्थिती, कारणे आणि परिणामाचे विश्लेषण
- प्रा. डॉ. बालाजी साबळे, सिरसाळा, ता.परळी, जि.बीड -------------------- १३५

२९ भारतातील दारिद्र्य : अन्न, दारिद्र्य आणि आरोग्य, शैक्षणिक उपलब्धी (कौशल्य) व राहणीमान
- श्रीकांत तांदळे, अंबाजोगाई, जि.बीड. ---------------------------------- १३९

३० मराठवाडा विभागातील ग्रामीण आणि शहरी भागातील दारिद्र्याचा अभ्यास
- १) प्रा.डॉ.बी. पी. गाडेकर, लातूर; २) प्रार्थना कसबे, लातूर ------------------ १४८

३१ भारतातील दारिद्र्याची समस्या: कारणमीमांसा व शासकीय योजना
- १) डॉ.विजय भोपाळे, पूर्णा, जि.परभणी; २) आनंद मैंद, छ.संभाजीनगर;----------- १५४

३२ आर्थिक विकासात महिलांची भूमिका: अडचणींवर मात
- प्रा.डॉ. राम सोलंकर, उमरगा, जि.धाराशिव ------------------------------ १६१

३३ लातूर जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण विकास
- १) डॉ.शंकर कडेकर; २) सुमीत सातपुते, लातूर. ------------------------ १६६

३४ भारतातील महिला सबलिकरण व महिलांची सद्यस्थिती
- डॉ.बालासाहेब मैंद, ढोकी, जि.धाराशिव --------------------------------- १७०

३५ महिला सक्षमीकरण आणि भारतीय महिलांची सद्यस्थिती - कु.कांचन गिरी, नांदेड -------- १७५

३६ विकास प्रक्रिया व महिलांचे आर्थिक स्वावलंबन : एक गुणात्मक चिकित्सक चिंतन
- डॉ.सविता बहिरट, छत्रपती संभाजीनगर. -------------------------------- १८१

३७ महिला सक्षमीकरण आणि महिलांची सद्यस्थिती : एक चिकित्सक अध्ययन
- डॉ.जयवंत जुकरे, दारव्हा, जि.यवतमाळ -------------------------------- १८७

३८ राष्ट्र उभारणीत महिला सक्षमीकरणाची भूमिका : एक अभ्यास
- प्रा.डॉ.राजश्री जाधव, अहमदपूर. ------------------------------------ १९३

३९ दुर्लक्षित महिला भांडवल - १) प्रा.डॉ.दीपक भारती; २) ज्योती साखरे, अंबाजोगाई, जि.बीड. १९६

४० महिला सक्षमीकरणाच्या विविध योजना
- १) डॉ.सुरेश खोंड, शिराढोण, ता.कळंब, जि.धाराशिव; २) शीतल जाधव, छ.संभाजीनगर-- २००

ISBN 978-81-931719-7-9

## भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राची भूमिका : विशेष संदर्भ पर्यटन

*प्रा.डॉ. ए. बी. मुळीक
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

**गोषवारा :** भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चाललेले असून सेवा क्षेत्रामध्ये अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत, विदेशी चलन ही प्राप्त होत आहे. सेवा क्षेत्रातील विदेशी गुंतवणूक वाढत आहे या सर्व घटकांचा विचार करता असे स्पष्ट होते की भारताच्या अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे. सेवा क्षेत्रामध्ये पर्यटनाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कारण पर्यटनामधून भारताच्या अर्थव्यवस्थेला खूप मोठा हातभार लागत आहे. पर्यटन हे विदेशी चलन प्राप्त करून देणारे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. त्यामुळे सेवा क्षेत्रातील पर्यटनाचे स्थानही महत्वपूर्ण ठरत आहे

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कमी अधिक प्रमाणात तीन क्षेत्रावर अवलंबून असते.यामध्ये प्राथमिक क्षेत्र,द्वितीय क्षेत्र आणि तृतीय क्षेत्राचा समावेश होतो. प्राथमिक क्षेत्रात शेती व शेतीशी संबंधित घटक द्वितीय क्षेत्रात उद्योग आणि तृतीय क्षेत्रात सेवा क्षेत्राचा समावेश होतो. विकासाच्या पहिल्या अवस्थेत कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीला महत्त्वाचे स्थान असते त्यानंतर हळूहळू अर्थव्यवस्था कृषी क्षेत्राकडून उद्योग व सेवा क्षेत्राकडे झुकत जाते. असे विकसित झालेल्या देशांच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला असता दिसून येते. भारताच्या अर्थव्यवस्थेतही सुरुवातीला 1950-51 मध्ये अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा वाटा सर्वाधिक असून सेवा क्षेत्राचा वाटा कमी असल्याचे दिसून येते. त्यानंतरच्या कालावधीत मात्र हळूहळू सेवा क्षेत्राचा वाटा वाढत जाऊन 2022-23 रोजी 54% पर्यंत येऊन पोहोचलेला दिसून येतो. यावरून असे लक्षात येते की भारताच्या अर्थव्यवस्थेतही सेवा क्षेत्राचे म्हणजेच तृतीय क्षेत्राचे महत्व वाढत आहे. सेवा क्षेत्रात पर्यटन ही एक सेवा असून विदेशी चलन प्राप्त करून देणारी अत्यंत महत्त्वाची सेवा म्हणून ओळखली जाते. हे लक्षात घेऊन प्रस्तुत शोधनिबंधासाठी "भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राची भूमिका : विशेष संदर्भ पर्यटन" हा विषय निवडलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राची भूमिका अभ्यासणे.
2. भारताच्या सेवा क्षेत्रातील पर्यटनाचे महत्त्व अभ्यासणे.

**संशोधनाचे गृहित :**

1. भारताच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण असून पर्यटनाचे महत्त्व वाढत आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला असून माहिती संकलनासाठी द्वितीय साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे या अंतर्गत संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र, आर्थिक सर्वेक्षण 2023,RBI अहवाल, इंटरनेट इत्यादी साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधन विषयाचे स्पष्टीकरण :**

प्रस्तुत अध्ययनामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राची भूमिका आणि सेवा क्षेत्रातील पर्यटनाचे महत्त्व या दोन विषयाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्र :**

अर्थव्यवस्था म्हणजे; मानवी गरजा भागविताना उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करण्यासाठी केलेले समग्र आर्थिक व्यवहार होय.

ISBN 978-81-931719-7-9

भारताची अर्थव्यवस्था कृषी उद्योग व सेवा या तीन क्षेत्रावर अवलंबून असून भारताच्या अर्थव्यवस्थेतील अलीकडच्या काळात वेगाने वाढत असलेले क्षेत्र म्हणजे तृतीय क्षेत्र होय. तृतीय क्षेत्र म्हणजेच सेवा क्षेत्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेतील व्यापक क्षेत्र असून हे क्षेत्र प्राथमिक व द्वितीय क्षेत्राला मदत करणारे क्षेत्र आहे त्यामुळे अर्थव्यवस्थेचा जसजसा विकास होत जातो तसतसा तृतीय क्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील वाटा वाढत जातो. त्यामुळे सेवा क्षेत्राला अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ म्हणून ओळखले जाते.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राचे वर्गीकरण:**

अर्थव्यवस्थेतील तृतीय क्षेत्रामध्ये विविध सेवांचा समावेश होत असून भारतातील केंद्रीय सांख्यिकीय संघटनेने (CSO) सेवांचे स्वरूपानुसार विविध प्रकारात वर्गीकरण केलेले आहे. यानुसार व्यावसायिक सेवा, वित्तीय सेवा, आरोग्य व सामाजिक सहाय्यसेवा, अथित्य आणि पर्यटन सेवा, माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचार सेवा, किरकोळ आणि घाऊक व्यापार, वाहतूक आणि लॉजिस्टिक सेवा, शिक्षण आणि प्रशिक्षण सेवा, मनोरंजन आणि मीडिया, वैयक्तिक सेवा इत्यादी सेवांचा समावेश होत असल्याचे दिसून येते. तसेच भारतीय रिझर्व बँकेने (RBI) आणि जागतिक व्यापार संघटना (WTO) यांनी केलेल्या वर्गीकरणात बांधकाम क्षेत्राचाही समावेश सेवा क्षेत्रात केला असून या सर्व सेवांचे मिळून अर्थव्यवस्थेतील तृतीय क्षेत्र म्हणजेच सेवा क्षेत्र निर्माण होत असल्याचे दिसते.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राची भूमिका :**

भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये सेवा क्षेत्राचे महत्व दिवसेंदिवस वाढत असून भारताच्या अर्थव्यवस्थेतील वेगाने गतिमान होणारे क्षेत्र म्हणून सेवा क्षेत्राला ओळखले जात आहे. परिणामी भारतीय अर्थव्यवस्थेतील एक प्रमुख व प्रेरक शक्ती म्हणून सेवा क्षेत्राची भूमिका वाढत आहे. कोणत्याही क्षेत्राची अर्थव्यवस्थेतील भूमिका जाणून घेण्यासाठी त्या देशाच्या अर्थव्यवस्थेतील संबंधित क्षेत्राचा GDP मधील वाटा, रोजगारातील वाटा, परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीतील वाटा तसेच देशाच्या निर्यातीतील वाटा इत्यादी घटक विचारात घेणे आवश्यक असते.

**भारताच्या जी.डी.पी.मधील सेवा क्षेत्राचा वाटा**

भारताच्या जी.डी.पी. मध्ये कृषी,उद्योग आणि सेवा या तीन क्षेत्रांचा समावेश होत असून 1950-51 मध्ये भारताच्या जी.डी.पी. मध्ये सेवा क्षेत्राचा वाटा केवळ 30.5% होता तो नंतरच्या कालावधीत कोविड कालखंडाचा अपवाद वगळता सातत्याने वाढत असल्याचे दिसते. 2021-22 मध्ये तो 53% एवढा राहिला असल्याचे दिसून येते. यावरून असे स्पष्ट होते की, भारताच्या जी. डी. पी. मध्ये सेवा क्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण आहे.

**भारताच्या रोजगारातील सेवा क्षेत्राचा वाटा :**

कोणत्याही देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून अर्थव्यवस्थेतील रोजगार हा एक महत्त्वाचा घटक आहे. भारतामध्ये रोजगार पुरविणारे कृषी, उद्योग आणि सेवा हे तीन क्षेत्र महत्त्वाचे आहेत. यापैकी सर्वात मोठे रोजगार पुरविणारे क्षेत्र म्हणून कृषी व संलग्न क्षेत्राची ओळख आहे असे असले तरीही अलीकडच्या काळात कृषी क्षेत्रातून पुरविले जाणाऱ्या रोजगाराच्या प्रमाणात हळूहळू घट होत असून सेवा क्षेत्रामधून रोजगार पुरविण्याचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाच्या (NSSO) 2011-12 च्या अहवालानुसार भारतात सेवा क्षेत्रातून पुरवल्या जाणाऱ्या रोजगारामध्ये 1993-94 च्या तुलनेत वाढ झाली असून तो 26.8% वाटा असल्याचे दिसून येते. यावरून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये रोजगार पुरविण्याच्या कार्यातील सेवा क्षेत्राची भूमिका वाढत असल्याचे सिद्ध होते.

**भारताच्या परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीतील सेवा क्षेत्राचा वाटा :**

शिवार्थ
ISBN: 978-81-931719-7-9

अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी भांडवलाची गरज असते. देशांतर्गत भांडवलाची जेव्हा कमतरता असते तेव्हा ही कमतरता भरून काढण्यासाठी परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीचा फायदा होत असतो या दृष्टिकोनातून विचार केला असता भारतामध्ये जी परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक येते ती सर्वच क्षेत्रांमध्ये होत असते; परंतु अलीकडच्या काळात परकीय गुंतवणूकदारांचा कल सेवा क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यावर अधिक असल्याचे दिसून येते. कारण सेवा क्षेत्राचा विकास वेगाने होत असल्यामुळे गुंतवणूकदारांनाही आकर्षित करणारे हे एक प्रमुख क्षेत्र बनले आहे. भारतासंदर्भात विचार करता सन 2016-17 मध्ये 8.6 बिलियन डॉलर एवढी परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक झाली असून 2018-19 मध्ये 9.2 बिलियन डॉलर एवढी विदेशी गुंतवणूक झाल्याचे दिसून येते यावरून सेवा क्षेत्रामध्ये विदेशी गुंतवणूक वाढत असल्याचे दिसून येते.

**भारताच्या निर्यातीत सेवा क्षेत्राचा वाटा :**

देशाच्या विकासासाठी विदेशी गंगाजळीची गरज असते. विदेशी गंगाजळी मिळवून देणारे निर्यात हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. भारताच्या निर्यातीमध्ये सेवा क्षेत्राचा वाटा 2000-01 पासून वाढत असल्याचे दिसते कारण भारताच्या सेवा क्षेत्रामध्ये वेगाने वाढ होत आहे. भारतामधून निर्यात केल्या जाणाऱ्या सेवांपैकी सॉफ्टवेअरचा प्रथम क्रमांक लागत असून त्या पाठोपाठ व्यवसाय सेवा वाहतूक सेवा यांचा क्रमांक लागतो. तसेच विदेशी गंगाजळी प्राप्त करून देणारे पर्यटन ही एक महत्त्वाची सेवा म्हणून या सेवेचे महत्त्व वाढत आहे.

सेवा क्षेत्राच्या वरील विश्लेषणावरून भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे सिद्ध होते.

**भारताच्या सेवा क्षेत्रातील पर्यटनाचे महत्त्व :**

भारताच्या सेवा क्षेत्रात विविध सेवांचा समावेश होतो त्यापैकी **पर्यटन (Tourism)** ही एक सेवा आहे. पर्यटनाकडे व्यवसाय म्हणूनही पाहिले जाते. **स्टीफन एल.जे.स्मित यांच्या मते;** 'जेव्हा मानव आपल्या राहत्या स्थानापासून बाहेर इतर ठिकाणी जातो आणि तेथे काही काळ राहतो त्या क्रियेस पर्यटन असे म्हणतात'. तसेच **हर्मर यांच्या मते;**'परदेशी माणसाचे एका देशात, प्रदेशात व शहरात आगमन, वास्तव,भ्रमंती आणि तेथून गमन म्हणजे पर्यटन होय.'

अलीकडच्या काळात भारताच्याच नव्हे तर संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेमध्ये पर्यटन क्षेत्राचे महत्त्व वाढत आहे. कारण जगाच्या उत्पन्नात व रोजगार निर्मितीत या क्षेत्राचे योगदान वाढत असल्याचे दिसून येते. तसेच भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात,आर्थिक विकासात, महसूल व विदेशी गुंतवणुकीत, रोजगार पातळीत आणि परकीय चलन मिळवून देण्या मध्ये पर्यटनाचा वाटा महत्त्वाचा आहे.

**भारतातील पर्यटनाची सद्यस्थिती :**

भारताच्या विकास प्रक्रियेमध्ये पर्यटनाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कारण आपला भारत हा देश विविधतेने नटलेला असून आपल्याकडे मोठमोठे पर्वत हिमालय,सह्याद्री, नद्या, समुद्र किनारे, सृष्टी सौंदर्य, दऱ्याखोऱ्या, विविध धर्मीय स्थळे, किल्ले, ऐतिहासिक वास्तू, सांस्कृतिक ठिकाणे इत्यादी आहेत या वास्तू व स्थळे भारतीय लोकांबरोबरच विदेशी पर्यटकांनाही आकर्षित करत असतात वाढत्या पर्यटनामुळे भारतामध्ये पर्यटनाच्या माध्यमातू खूप मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होऊ शकतो. विदेशी गंगाजळी मिळू शकते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला फायदा होऊ शकतो त्यामुळेच भारतामध्ये पर्यटन विकास होण्यासाठी विविध धोरणे शासकीय पातळीवरून राबविले जात असल्याचे दिसून येते.

**भारतातील पर्यटनातील अग्रेसर राज्य :**

भारत हा विविधतेने नटलेला देश असून भारताच्या सर्वच भागामध्ये पर्यटन होत असते. असे असले तरी देशात भारतामध्ये सर्वाधिक पर्यटन होत असलेल्या राज्यांमध्ये जवळपास 84.75 टक्के

शिवार्थ
ISBN: 978-81-931719-7-9

वाटा हा उत्तर प्रदेश, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, पश्चिम बंगाल, तेलंगणा, उत्तराखंड या राज्यांना असून उर्वरित राज्यांना वाटा केवळ 15.25% असल्याचे दिसून येते.

**भारतातील देशांतर्गत पर्यटक संख्या :**

पर्यटन हे दोन प्रकारे होत असते एक देशांतर्गत पर्यटन आणि दुसरे आहे परदेशी पर्यटन देशांतर्गत पर्यटनामध्ये देशातील लोक वेगवेगळ्या राज्यात फिरत असतात. या संदर्भात आपण जर भारतातील आकडेवारी पाहिली तर आपल्याला असे लक्षात येते की, 2011 मध्ये 864.53 मिलियन लोकांनी पर्यटन केले त्यानंतर 2015 मध्ये 1431.97 मिलियन लोकांनी पर्यटन केल्याचे आपल्याला दिसून येते तर 2020 मध्ये 610.22 एवढ्या कमी लोकांनी पर्यटन केल्याचे आपल्याला दिसून येते कारण हा काळ कोविडचा होता आणि त्यामुळे पर्यटनावर परिणाम होऊन पर्यटनाची आकडेवारी कमी झालेली आपल्याला दिसते त्यानंतर 2021 मध्ये 677.63 मिलियन लोकांनी पर्यटन केल्याचे दिसते म्हणजेच कोविड समस्येनंतर पर्यटनात वाढ झाल्याचे आपल्याला दिसून येते.

**भारतातील विदेशी पर्यटक संख्या :**

भारत हा विदेशी पर्यटकांच्या बाबतीत नेहमीच आकर्षणाचे केंद्र राहिलेला आहे कारण भारत विविधतेने नटलेला देश आहे त्यामुळे विदेशी पर्यटकांची पसंती भारताला असल्याचे आपल्याला दिसून येते. परिणामी भारताच्या विदेशी पर्यटक संख्येमध्ये कोविड कालखंडाचा अपवाद वगळता सातत्याने वाढ झाल्याचे आपल्याला दिसून येते. 2011 मध्ये भारतात आलेल्या पर्यटकांची संख्या 19.50 मिलियन एवढी होती. त्यानंतर 2015 मध्ये ही संख्या 23.33 मिलियन एवढी झाल्याचे आपल्याला दिसून येते. तसेच 2019 मध्ये 31.41 मिलियन विदेशी लोक भारतात पर्यटनासाठी आल्याचे आपल्याला दिसते; परंतु 2020 मध्ये केवळ 7.17 मिलियन लोक पर्यटनासाठी भारतात आले कारण संपूर्ण जगभर कोविड-19 ची साथ सुरु होती. या साथीचे परिणाम 2021 मध्ये ही दिसून येतात. 2021 मध्ये केवळ 1.05 मिलियन लोकांनी पर्यटनासाठी भारताला भेट दिल्याचे आपल्याला दिसून येते. त्यानंतर 2022 मध्ये यामध्ये सुधारणा होऊन 8.59 मिलियन लोक भारतात पर्यटनासाठी आल्याचे आपल्याला दिसून येते. असे असले तरी कोविडमुळे भारताच्या विदेशी पर्यटनावर खूप मोठा विपरीत परिणाम झाल्याचे आपल्याला दिसून येते.

**भारताला पर्यटनातून मिळालेले विदेशी चलन :**

भारताच्या एकूण अर्थव्यवस्थेचा व अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्रातील सर्व सेवांचा विचार करता पर्यटन हा घटक खूप लहान आहे परंतु पर्यटन हे एक असे क्षेत्र आहे की या माध्यमातून परकीय चलन मिळवून देण्यात या क्षेत्राचा वाटा खूप मोठा आहे त्यामुळेच या क्षेत्राला सेवा क्षेत्रात व एकूण देशाच्या अर्थव्यवस्थेत खूप महत्त्वाचे स्थान आहे. भारतामध्ये 2013 ते 2022 या कालखंडात पर्यटनातून मिळालेले विदेशी चलन खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

**भारतामध्ये 2013 ते 2022 या कालखंडात पर्यटनातून मिळालेले विदेशी चलन**

**(आकडेवारी कोटी मध्ये)**

| वर्ष | पर्यटनातून मिळालेले विदेशी चलन | वार्षिक वाढ व घट | शेकडा% वाढ व घट |
|---|---|---|---|
| 2013 | 1,07,563 | - | - |
| 2014 | 1,20,366 | 12,803 | 11.90 |
| 2015 | 1,34,843 | 14,477 | 12.02 |
| 2016 | 1,50,750 | 15,907 | 11.79 |

शिवार्थ
ISBN: 978-81-931719-7-9

| | | | |
|---|---|---|---|
| 2017 | 1,78,189 | 27,439 | 18.20 |
| 2018 | 1,95,312 | 17,123 | 9.60 |
| 2019 | 2,16,467 | 21,155 | 10.83 |
| 2020 | 50,136 | -1,66,331 | -76.83 |
| 2021 | 65,070 | 14,934 | 29.78 |
| 2022 | 1,34,543 | 69,473 | 106.76 |
| एकूण | 13,53,239 | - | - |

*Source: India Tourism Statistics, 2022*

वरील तक्त्यानरून आपणास असे लक्षात येते की, 2013 ते 2022 या दहा वर्षाच्या कालखंडामध्ये भारताला पर्यटनातून एकूण 13,53,239 कोटी रुपये एवढे विदेशी चलन प्राप्त झाले असून 2013 ते 2019 पर्यंत सातत्याने विदेशी चरणात वाढ झाल्याचे आपणास दिसून येते. 2020-21 मध्ये विदेशी चलनाच्या प्रमाणात खूप मोठ्या प्रमाणात घट झाली असून 2022 मध्ये मात्र 106.76 टक्क्याने वाढ झाल्याचे दिसून येते.

एकंदरीत; अशा पद्धतीने वरील सर्व विवेचनावरून भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्र व सेवा क्षेत्रातील पर्यटन या विषयाचे विश्लेषण करता येते. या विश्लेषणावरून काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

**निष्कर्ष :**

1) विकासाच्या पहिल्या अवस्थेत कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीला महत्त्वाचे स्थान असते त्यानंतर हळूहळू अर्थव्यवस्था कृषी क्षेत्राकडून उद्योग व सेवा क्षेत्राकडे झुकत जाते.

2) अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राचे उत्पन्नातील योगदान जी.डी.पी. मधील योगदान, रोजगारातील योगदान, विदेशी चलन प्राप्तीतील योगदान इत्यादी वरून भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे सिद्ध होते.

3) 2013 ते 2022 या दहा वर्षाच्या कालखंडामध्ये भारताला पर्यटनातून एकूण 13,53,239 कोटी रुपये एवढे विदेशी चलन प्राप्त झाले असून 2013 ते 2019 पर्यंत सातत्याने विदेशी चरणात वाढ झाल्याचे आपणास दिसून येते. 2020-21 मध्ये विदेशी चलनाच्या प्रमाणात खूप मोठ्या प्रमाणात घट झाली असून 2022 मध्ये मात्र 106.76 टक्क्याने वाढ झाल्याचे दिसून येते.

4) भारताच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राची व सेवा क्षेत्रात पर्यटनाचे महत्त्व वाढत असल्याचे दिसून येते.

**शिफारस :** अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राचे महत्त्व विचारात घेता सेवा क्षेत्राच्या व पर्यटनाच्या विकासासाठी शासनाने व्यापक दृष्टिकोनातून प्रयत्न केले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :**

1) Gov. Of India 2022 India Tourism Statistics, 2022

2) Gov.of India 2023 economic Survey 2023

3) RBI Bulletin 2023.

4) Gaurav Datt & A Mhajan (2022) Indian Economy s chand Publication new Delhi

5) www.tourisme.gov.in

6) www.gov.in

&&&